Vol. 4 Special Issue -1 March 2018
(UGC Approved Journal No. 63716)

ISSN: 2454-5503
IMPACT FACTOR: 4.197(IIJIF)

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

A BIMONTHLY REFEREED INTERNATIONAL JOURNAL


Special Issue on the Occasion of Maharashtra State Commission For Women and YCMOU Study Centre Sponsored National Seminar on

**Domestic Injustice and Women**

March 8, 2018

Organized by

**Dept. of Home Science,
Shri Panditguru Pardikar Mahavidyalaya,
Sirsala, Dist. Beed (MS).**



*Guest Editor*
**Dr. R. T. Bedre**

*Associate Guest Editors*
**U. Y. Mane**
**A. B. Walke**

IMPACT FACTOR:4.197(IIJIF) | UGC APPROVED JOURNAL NO. 63716 | ISSN: 2454-5503

# CHRONICLE

## OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES (CHCS)

VOL. 4 SPECIAL ISSUE 1 MARCH 2018

A Bimonthly Refereed International Journal

Special Issue On

## Domestic Injustice and Women

*Guest Editors*

**Prin. Dr R.T.Bedre**

*Associate Editors*

**U. Y. Mane A. B. Walke**

***Editorial Board***

Dr. M. B. Dhondge
Dr A. V. Jadhav
Mr R. I. Mahmmad
Mr. R. M. Ahire
Dr A. V. Kasande
Mr V. S. Dhanve
Mr S. D. Paralkar
Dr. Vaishali Aher

*Mahatma Gandhi Education and Welfare Society's*

**CENTRE FOR HUMANITIES AND CULTURAL STUDIES, KALYAN (W)**

*www.mgsociety.in +91 9730721393 Email: chcskalyan@gmail.com*

86

18. Vijay Tendulkar's 'Silence! The Court is in Session': A Woman Denied the Right to be a Woman / Mr. Tukaram B. Bobade | 91

19. भारतीय समाज और महिलाएँ / पी. सुनीता | 97

20. छहेज:स्त्री उत्पीडन प्रथा और प्रतिबन्धक कानून / प्रा विद्या बा. खाडे | 103

21. घरेलू हिंसाःमहिलाओं का जीवनसंघर्ष एक विवेचन / प्रा.सुजाता सू. हजारे | 107

22. स्त्रियांचा वडिलोपार्जित संपंत्तीतील समान हक्क कायदा 2005 : एक अभ्यास / प्रा.उषा यशवंतराव माने | 114

23. स्त्रियांचा वडिलोपार्जित व पतीच्या संपत्तीतील हक्क. / डॉ.सोमवंशी मुक्ता (गंगणे) | 122

24. स्त्रीयांचा वडिलोपार्जित व पतीच्या संपत्तीतील हक्क / प्रा. राणी जगन्नाथराव जाधव | 128

25. स्त्रियांच्या विकासातील उच्चषिक्षणाचे महत्व एक अभ्यास / डॉ.जयदिप रा. सोळंके | 139

26. **स्त्रीया व मानवी हक्क** / प्रा.डॉ. अहिरे भास्कर मुरलीधर | 146

27. **स्त्रिया व मानवी हक्क** / प्रा.डॉ.शिवाजी गोविंदराव दिवाण | 151

28. **स्त्रिया व मानवी हक्क** / डॉ. बाबासाहेब गणपतराव देशमुख | 158

29. **स्त्रिया व मानवी हक्क** / प्रा. सलमा शेख, प्रा.निकाळजे जे. व्ही. | 164

30. **महिला अत्याचार** / प्रा.बिजायसिंग भाबरदोडे | 166

31. **महिलावरील कौटुंबीक अन्याय आणि मानवाधिकार : संवैधानिक तरतुदींचा अभ्यास** / डॉ.प्रा.जी.व्ही. गट्टी | 175

32. मानवाधिकार व स्त्रीयांचे प्रष्न एक दृष्टीक्षेप / प्रा.डॉ.कदम एच.पी. | 179

33. महिला सबलीकरण विषयी कायदे व जाणीवा / डॉ.लोखंडे बी.बी. | 182

34. महिंला अत्याचार विरोधी कायदेविषयक तरतूदींचा अभ्यास./ प्रा.शशिकांत परळकर | 191

35. महिलांच्या लैगिक छळ विरोधी कायदा भूमिका व मार्गदर्शन / डॉ. प्रतिभा सदाशिव देसाई | 196

36. महिला विषयक कायदे एक अभ्यास / प्रा.अरूणा वाळके | 203



67

# 27

# स्त्रिया व मानवी हक्क

**प्रा.डॉ.शिवाजी गोविंदराव दिवाण**
राज्यशाास्त्र विभाग,
महिला महाविद्यालय गेवराई जि.बीड 431127

निसर्गतः स्त्री आणि पुरुष निर्माण केले असून स्त्रीला निसर्गाने विविध प्रकारची शक्ती प्रदान केली आहे. तथापि भारतीय समाजातील स्त्रियांचा विचार केला तर आजही ग्रामीण भागात वास्तव करणा–या स्त्रियांना त्यांच्या हक्काची अधिकाराची, अस्तित्वाची जाणीव नसलेली दिसून येते.

समाजातील रुढी, परंपरा, अंधश्रध्दा, बालविवाह, पुरुषप्रधान संस्कृती आहेत. आजच्या 21 व्या शतकातील स्त्रीमध्ये त्यांच्या स्वातंत्र्यामध्ये माणूस जगण्याच्या हक्कामध्ये बरेच परिवर्तन झालेले पहावयास मिळते. यासाठी समाजसुधारकांनी केलेले प्रयत्न, सामाजिक कायदे, शिक्षणाचा प्रसार, मानवी हक्काच्या तरतुदी इत्यादी कारणीभूत आहेत असे म्हणता येईल.

स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने विकासाच्या आणि प्रगतीच्या समान संधी उपलब्ध करुन देणे. लिंगभेदावर आधारित विषम समाजव्यवस्था नष्ट करुन स्त्री–पुरुष समानतेवर आधारित नवीन व्यवस्था निर्माण करणे हे महिला अधिकाराचे कार्य म्हणता येईल.

मानवी हक्क हे संबोधन नवीन वाटत असले तरी याची पाळेमुळे नैसर्गिक हक्क या प्राचीन तत्त्वज्ञान आढळतात. मानवी हक्क ही संज्ञा अचानक निर्माण झालेली नसून ती अनेक वर्षात विकसित झाली आहे. थॉमस व्हॉब्ज, जॉनलॉक, रुसो या विचारवंतांनी सामाजिक करार सिध्दांत मांडून राजा हा ईश्वराचा अंश आहे. अशा परंपरागत विचारांना छेद देवून लोकांना निसर्गदत्त अधिकार असतात. हे त्यांनी प्रथमतः प्रतिपादन केले.

**मानवी हक्काचा अर्थ :–**

**रॅन्डम हाउस विश्वकोश :–**

मानवी हक्क म्हणजे व्यक्तिला जन्माने प्राप्त झालेले असे हक्क जे व्यक्तीला सन्मानाने जगण्यासाठी आवश्यक आहेत.

**मॅकफरलेन :–** मानवी हक्क हे असे नैतिक हक्क आहेत. जे प्रत्येक स्त्री आणि पुरुषाला माणूस या नात्याने प्राप्त झालेले आहेत.



68

**डवार्कीन** :— मानवी हक्क हे मानवाला प्राप्त झालेले असे हक्क आहेत की, ज्याचे सार्वजनिक हितासाठी देखील राज्याकडून उल्लंघन होवू शकत नाही आणि राष्ट्रीय कायद्याशिवाय देखील ते उपभोगता येवू शकतात.

**मॉरीस क्रॅटसन** :— मानवी हक्क हे स्वातंत्र्याचे सर्वोच्च आणि पवित्र अधिकार असून त्यांचे उल्लंघन राज्याला करता येत नाही.

सन 1993 चा भारतातील मानव अधिकार संरक्षण कायद्यानुसार मानवी हक्क म्हणजे व्यक्तीचे स्वातंत्र जीवन आणि समतेशी निगडीत असे मुलभूत अधिकार की ज्याच्या संरक्षणाची हमी राज्यघटनेने दिली आहे आणि आंतरराष्ट्रीय ठरावामध्ये ज्याचा समावेश आहे.

मानवी हक्क म्हणजे सर्व माणसांना मिळणारे असे नैसर्गिक हक्क आहेत की जे सर्व मानवांना जन्मतः प्राप्त होतात. आणि जे त्यांच्यापासून वेगळे करता येत नाहीत. वरील व्याख्येवरुन असे लक्षात येते की, मानवी हक्क हे प्रत्येक व्यक्तीला जन्मतः प्राप्त होतात. त्याचा उपभोग कोणत्याही राष्ट्रीय कायद्याशिवाय घेता येवू शकतो. तसेच स्त्री–पुरुष या दोन्ही घटकांना ते समानपणे प्राप्त होतात आणि सामाजिक हिताच्या नावाखाली राज्य देखील त्याचे उल्लंघन करु शकत नाही.

**भारतीय राज्यघटना आणि महिला** :—भारतीय राज्यघटनेने स्त्री–पुरुष यांना समान स्थान दिलेले आहे. राज्यघटनेच्या उददेशपत्रिकेत देखील स्त्री–पुरुष या दोन्ही घटकांना सारखेच अधिकार आहेत. भारतीय राज्यघटनेत महिला संबंधी विशेष तरतूद असणारी विविध कलमे निर्माण करण्यात आली आहेत. कलम 14 कायद्यापुढे समानता, कलम 15 धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थान या कारणावरुन भेदभावास मनाई, कलम 15(3) स्त्रीया व बालके यांच्या करीता कोणताही विशेष कायदा करण्यास राज्याला प्रतिबंध करता येणार नाही. कलम 16 सार्वजनिक सेवेमध्ये समान संधी, कलम 23 व 24 शोषणाविरुध्दचा हक्क, 14 वर्षापेक्षा कमी वय असलेल्या मुलगा व मुलगी कामकाज व वेठबिगारिस मनाई, कलम 39(क) उपजीविकेचे साधन मिळविण्याचा स्त्री–पुरुषांना समान हक्क,तसेच कलम 39 ब समान कामाबददल समान वेतन, कलम 44 समान नागरी कायदा, कलम 51 (अ) (इ) सर्व भारतीयांमध्ये सुसंवाद व भ्रातभाव निर्माण करण्यास हातभार



69

लावणे, स्त्रीयांच्या प्रतिष्ठिला मारक ठरणा–या चालीरितींचा त्याग करणे, यासारख्या कलमातून भारतीय राज्यघटना महिलांना संरक्षण पुरविते.

भारतीय संविधान आणि स्त्रीयांचे मानवी हक्क राष्ट्रीय आंदोलनातील महिलाचा सक्रिय सहभाग आणि त्याच्यावरील धार्मिक व सामाजिक क्षेत्रातील मागासलेपण याबाबत संविधान करते पूर्णतःहा जाणून होते. संविधान निर्मितीतच मतदानाचा हक्क बहाल केला होता. याच मतदानाच्या हक्कासाठी इतर देशातील स्त्रियांना खुप मोठया प्रमाणावर संघर्ष द्यावा लागला होता. भारतीय संविधानाने स्त्रियांना पुढील प्रमाणे हक्क बहाल केले आहेत.

**विवाहाचे स्वातंत्र्य :–** या स्वातंत्राच्या अंतर्गत भारतीय स्त्रियाना अंतधर्मिय आंतरजातीय विवाह करण्याचे स्वातंत्र बहाल केले आहे. विवाह अधिनियम 1929 अन्वये बालविवाह कायद्याने बंदी केली आहे.

**गर्भ धारणेचे स्वातंत्र्य :–** अधिनियम 1971 च्या अन्वये जर गर्भधारने मुळे महिलेच्या स्वास्थावर विपरीत परिणाम पडणार असतील ती स्व निर्णयाने गर्भपात करु शकते. त्यासाठी पती किंवा इतर कोणाचीही गरज नाही. प्रस्तुती सुविधा अधिनियम 1961 च्या अन्वये स्त्रीला प्रस्तुती कालीन रजा देणे हे बंधनकारक केले आहे. अविवाहित स्त्री देखील या कायद्यान्वये रजेच्या हक्कास पात्र ठरते.

**घटस्फोटाचा अधिकार :–** पुरुषा प्रमाणेच स्त्रायांनाही घटस्फोटाचा अधिकार भारतीय संविधानाने दिला आहे. हिंदु विवाह अधिनियम 1955 कलम 13 या अंतर्गत हिंदु स्त्रिया तसेच 1939 मध्ये मुस्लिम विवाह कायद्या अंतर्गत मुस्लिम स्त्रियांना घटस्फोटाचा अधिकार प्राप्त होतो. तसेच अधिनियम 1554 मधील कलम 27 व 28 अंतर्गत विशेष विवाहाची फारकत प्रत्येक धर्मातील स्त्रियांसाठी केली गेली आहे.

**दत्तक घेण्याचा अधिकार :–** हिंदु दत्तक ग्रहन अधिनियम 1956 च्या कलम 8 अन्वये स्त्रीस शांतता पूर्वक मुलगा किंवा मुलीस दत्तक घेवू शकते. यापूर्वी हा अधिकार केवळ विधवा स्त्रियास किंवा घटस्फोटीत स्त्रियास होता.

**महिला श्रमीक कायदा :–** भारतीय संविधान 39 कलम या अंतर्गत पुरुषा प्रमाणेच स्त्रियांना देखील रोजगार मिळविण्याचा समान

अधिकार बहाल केला गेला आहे. तसेच 39 कलमा अंतर्गत समान कामासाठी समान वेतन हे तत्व लागू केले गेले.

**पोटगी मागण्याचा अधिकार :–** घटस्फोट झाल्यानंतर किंवा पती आपल्या पत्नीस योग्य पध्दतीने वागणूक देत नसेल अशा वेळी भारतीय संविधानाने स्त्रियांना आपला उदरनिर्वाह करण्यासाठी पोटगी मागण्याचा अधिकार आहे. अधिनियम 1956 च्या कलम 18 या अंतर्गत स्त्रिया तसेच मुस्लिम लॉ 1973 अंतर्गत कलम 125 ते 128 अंतर्गत पोटगी मागू शकते. तसेच जर एखादया पुरुषाने विवाह न करता देखील एखाद्या स्त्रिया सोबत राहत असेल तर अशा विशिष्ट परिस्थितीत त्या विवाह न झालेल्या स्त्रियांना देखील पोटगीचा अधिकार प्राप्त होता.

**भारतीय राज्यघटनेत मुलभूत हक्कांचे वर्गीकरण :–** भारतीय राज्यघटनेत नागरिकांच्या मूलभूत हक्कांच्या रक्षणाची तरतुद करुन ठेवली आहे. त्यासाठी राज्यघटनेतील प्रकरण तीन मधील कलम 12 ते 35 मध्ये मुलभूत हक्काच्या समावेष करण्यात आला आहे. सुरुवातीला भारतीय नागरिकांना सात मूलभूत हक्क देण्यात आले होते. पण 44 व्या घटनादुरुस्तीने (1978) संपत्तीच्या हक्काला वगळण्यात आले आहे. त्यामुळे सध्या भारतीय नागरीकांना सहा मुलभूत हक्क खालील प्रमाणे प्राप्त असल्याचे दिसते.

1. समतेचा हक्क (कलम 14 ते 18 )
2. स्वातंत्र्याचा हक्क (कलम 19 ते 22)
3. शोषणा विरुध्दचा अधिकार (कलम 23ते24)
4. धर्म स्वातंत्र्याचा हक्क (कलम 25 ते 28)
5. संस्कृती व शिक्षण विषयक हक्क(कलम 29ते30) 6. घटनात्मक उपाययोजनेचा हक्क (कलम 32)

वरील 32 व्या कलमाला अतिशय महत्त्व दिले जाते. या कलमाचे महत्व विशद करताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी असे म्हटले होते की, ज्या कलमावाचून घटना निरर्थक ठरली असती असे या घटनेतील सर्वांत महत्त्वाचे कलम कोणते, असे जर मला कोणी विचारले तर प्रस्तुत कलमाशिवाय दुस–या कोणत्याही कलमाचा निर्देश मला करता येणार नाही. वरील प्रमाणे मुलभूत हक्कांना घटनाकर्त्यांनी स्थान दिल्याचे दिसते.

**केंद्र व राज्य शासनाच्या वतीने चालविण्यात येणारे महिला विकास कार्यक्रम :–** केंद्र व राज्य शासनानी महिलांच्या हक्कासाठी



९।

वेगवेगळे कायदे करुन शासन यावरही न थांबता त्यांनी महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध योजना खालील प्रमाणे सुरु केल्याचे दिसते.

**महिला सक्षमीकरणासाठी राष्ट्रीय मिशन (NMEW)**–2010–2011 साली महिलांच्या सक्षमीकरणाच्या पुढाकाराची सुरुवात सर्वोत्तम एककेंद्रभिमुखता आणि विभिन्न मंत्रालयाच्या योजना आणि धोरण निर्मितीसाठी झाली. यामध्ये राज्य पातळीवर स्टेट मिशन ॲथॉरिटीज व स्टेट रिर्सोस सेंटर फॉर वुमेन या संस्था संबंध देशभरात स्थापन करण्यात आल्या.

**उज्वला** – मानवी व्यापाराला प्रतिबंध करणारी उज्वला ही योजना आहे. या योजनेचे प्रतिबंध, मुक्तता, पुनर्वसन, पुर्नएकाग्रता आणि मानवी व्यापाराच्या पीडीतांची परत पाठवणी इत्यादी 5 घटक आहेत. ही योजना दि.04 डिसेंबर 2007 रोजी केली.

**महिलाविरोधी हिंसाचाराला संबोधित करणारी धोरणे** – दिल्लीतील सामुहिक बलात्काराची घटना घडल्यानंतर माजी सरन्यायाधिश जे. एस.वर्मा यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या शिफारशीनुसार एका थांबा आपत्ती केंद्र यासारखा नवीन सुरु करण्यात आली. या अंतर्गत महिलांना निवारा, पोलीसांचे सहाय, विधित्मक, वैद्यकिय मदत आणि सार्वजनिक इस्पितळात समुपदेशन इत्यादी बाबींचा समावेश होतो. 12 व्या पंचवार्षिक योजनेत पीडीत महिलेला वित्तीय सहाय पुरविण्याची योजना केली आहे.

**कौटुंबिक समुदपेशन केंद्र** – कौटुंबिक हिंसा व अत्याचाराच्या बळी ठरलेल्या मुली व स्त्रियांचे पुनर्वसन करण्यासाठी ही केंद्र स्थापन करण्यात आली आहेत.

**शालेय शिक्षण तसेच उच्च व तंत्र शिक्षण** विभागाच्या मुलींसाठी **योजना** –

1. दुर्बल घटकातील मुलींच्या पालकांना हजेरी भत्ता दिला जातो
2. महिलांसाठी वसतीगृहे
3. आहित्यादेवी होळकर मोफत प्रवास योजना
4. आदर्श स्त्री शिक्षिका पुरस्कार
5. 12 वी पर्यंत शिक्षण घेणा–या मुलींना मोफत शिक्षण
6. सावित्रीबाई फुले कल्याण योजना
7. महिला व्यवसाय शिक्षणाचे प्रशिक्षण, महिला महाविद्यालये
8. महिला विद्यापीठे



92

**भारतीय संविधानातील मानवी हक्क संरक्षणासाठी कायदे व तरतुदी :—**

1. भारताची राज्यघटना(सरनामा,कलम 226,300,325,326)
2. मानवी हक्काचा संरक्षण कायदा—1993
3. महिलांसाठी राष्ट्रीय आयोग कायदा – 1990
4. अनैतिक व्यापार (प्रतिबंध)कायदा—1956
5. स्त्रियांचे अश्लील प्रदर्शन (प्रतिबंध) कायदा —1986
6. हुंदा प्रतिबंधक कायदा – 1961
7. प्रसूतीविषयक लाभ कायदा – 1961
8. बालविवाह विरोध कायदा – 1929
9. सती जाणे (प्रतिबंध) कायदा – 1987
10. वैद्यकिय गर्भपात कायदा – 1971
11. जन्मपूर्व निदान/गर्भनिदान तंत्रज्ञान (नियमन आणि गैरवापरात प्रतिबंध) कायदा—1994
12. कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा
13. कलम 93(5) पुरुष आणि स्त्रिया या दोघांना समान कामासाठी समान मोबदला मिळेल.

**मानवी हक्क भंगास कारणीभूत घटक :—** मानवी हक्कांच्या कायद्यांच्या अंमलबजावणीत अनेक सामाजिक,सांस्कृतिक,आर्थिक समस्या येतात. त्यामुळे महिलांना या हक्कांचा व स्वातंत्र्याचा उपयोग घेता येत नाही. त्याची पुढील प्रमाणे कारणे सांगता येतात.

1. गरिबी, आर्थिक परावलंबन यामुळे स्त्रिया आपल्या हक्कांसाठी समाजात व न्यायालयात दाद मागू शकता नाही.
2. निरक्षरता यामुळे स्त्रियांना आपल्या हक्कांची जाणीव नसते. तसेच त्यांचे प्रबोधन घडून येण्यासाठी बराच वेळ लागतो.
3. सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक प्रथांमुळे स्त्रियांची मानसिकता आपल्यावरील अत्याचाविरुध्द आवाज उचलण्याची नसते.
4. दृष्टिकोनात फारसा बदल नाही. स्त्रियांच्या दुययमस्थानात आजही बदल झाला नाही.
5. वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अभावामुळे ब—याच स्त्रिया अंधश्रध्दा व भोंदूबाबा यांच्याकडून शारिरिक व मानसिक छळ व शोषण होते.
6. मानवी हक्क संरक्षण कायद्याची पूर्ण माहिती स्त्रियांना नाही.

7. सामाजिक संघटना त्याबाबत सक्रिय वाटत नाही.
8. स्त्रियांची अन्याया विरुध्द लढण्याबाबत उदासीनता
9. पोलीस यंत्रणे विषयीची भिती हे देखील मानवी हक्काभंगास कारण ठरते.
10. स्त्रियांतील मानव अधिकार/हक्काविषयी अविश्वास, संशय हा या अधिकारांच्या अमंलबजावणीतील मोठा अडथळा आहे.
11. मानवी हक्क संरक्षण कायदयाविषयी जनजागृतीचा अभाव
12. न्यायालयीन कामातील दिरंगाई यामुळे देखील स्त्रियांना आपल्या हक्कांचा उपयोग घेता येत नाही. न्यायाचा उशीर म्हणजेच एक प्रकारचा हक्कभंगच होय.

भारतात अस्तित्वात असणा–या स्त्रियांच्या स्थिती विषयीचा विचार करता समोर येणारे वास्तव हे अत्यंत विदारक असलेले दिसते. 1951 पासून 2011 मधील दर हजारी स्त्रियांचे प्रमाण पाहिल्यास ते अनुक्रमे 946 ते 926 इतके घटलेले दिसते. भारतातील बलात्कार, विनयभंग, लैगिक शोषणाच्या आकडेवारीमध्ये वर्षागणिक मोठया प्रमाणात वाढ झालेली दिसते. भारतातील स्त्रियांबाबत अशा असंख्य उल्लंघनाच्या घटना घडत असल्याने महिला मानवी हक्क संरक्षण संघटना, स्त्री संघटना, स्त्री मुक्ती संघटना यांच्याकडून मोठया प्रमाणात याविरुध्द लढा दिला जातो आहे.

**संदर्भग्रंथ :–**


1. भारंबे नंदकुमार, मानवी हक्क व समाज, निराली प्रकाशन,पुणे.
2. भारतातील महिला विकासाची वाटचाल, रेहाना घडीयाला.
3. कुमार मनिषा, महिला सशक्तीकरण दशा और दिशा.
4. प्रदिप त्रिपाठी, मानव अधिकार और भारतीय संविधान,राधा पब्लिकेशन,नई दिल्ली–2002.
5. शासन आणि राजकारण, डी.बी.पाटील, उर्मिला चव्हाण.
6. स्पर्धा परीक्षा जुन 2010, स्टडी सर्कल प्रकाशन
7. स्त्रियांचे कौंटुबिक आणि विवाह विषयक हक्क, प्रा.डॉ.उषा पाटील, योजना, जुलै 2009.


❑❑❑


Sawant K.D.
Lecturer in History
Mahila College, Georai.




84